प्रेस नोट दिनांक. २२/०५/२०२४

**आरोपी १. गजानन रामभाऊ जंत्रे , श्रेणी पोलीस उप निरीक्षक (वर्ग ३), पो.स्टे.मानवत २. मुन्तसिर खान कबीर खान पठाण उर्फ बब्बुभाई, रा. मानवत ५०,०००/- रूपयांची लाच स्विकारताना एसीबी परभणी यांचे जाळयात**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | ॲन्टी करप्शन ब्युरो, परभणी |
| पोलीस स्टेशन गुरनं कलम | मानवत २५११/२०२४ कलम ७,७ अ,१२ भ्र.प्रति.अधि १९८८ व कलम २०१ भादवि |
| आरोपी यांचे नाव, हुद्दा व पत्ता. | १. गजानन रामभाऊ जंत्रे , वय ५४ वर्षे, पद - श्रेणी पोलीस उप निरीक्षक (वर्ग ३), नेमणूक पो.स्टे.मानवत जि.परभणी रा.राजर्षी शाहू महाराज नगर, मानवत, ता. मानवत, जि.परभणी<br>२. मुन्तसिर खान कबीर खान पठाण उर्फ बब्बुभाई, वय ५८ वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी, रा.खडकपुरा कुरेशी गल्ली, मानवत, ता.मानवत, जि.परभणी |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ७०,०००/- रू. |
| लाचेची स्विकारली रक्कम | ५०,०००/- रू. |

थोडक्यात माहिती :- यातील आरोपी लोकसेवक श्रेणी पो.उप.नि जंत्रे यांनी तक्रारदार यांचे रेतीचे ट्रक व ट्रक चालकास रेतीची वाहतूक करताना पकडले होते. त्यावरून पो.स्टे.मानवत येथे गुरनं १५९/२०२४ कलम ३७९,३४ भा.द.वि. अन्वये गुन्हा दाखल आहे.सदर गुन्ह्यातील जप्त ट्रक सोडविण्याकरिता मा.न्यायालयात रिपोर्ट (say) सादर करण्याकरिता आरोपी लोकसेवक जंत्रे यांनी तक्रारदार यांना १,००,०००/- रू. मागितले. सदर रक्कम ही लाच असून तक्रारदार यांना ती देण्याची इच्छा नसल्याने दि.१९/०५/२०२४ रोजी त्यांनी एसीबी परभणी येथे तक्रार दिली.

दि.२१/०५/२०२४ रोजी मानवत येथे पंचासमक्ष करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणी दरम्यान आलोसे जंत्रे यांनी पो.स्टे.मानवत येथे त्यांचे कक्षात तक्रारदार यांना त्यांचे पोलीस कस्टडी रिमांडचे वेळी केलेल्या मदतीसाठीचे राहिलेले १०,०००/- रु लाच मागणी केली. तक्रारदार यांनी ते १०,०००/- रू. माफ करा असे म्हणाले वरून मा. न्यायालयात रिपोर्ट (say ) दाखल करण्यासाठी तडजोडी अंती ७०,०००/- रू. लाचेची मागणी आलोसे जंत्रे यांनी केली. त्यापैकी पहिला हप्ता ५०,०००/- रू. तेथे हजर असलेला आरोपी खाजगी इसम मुन्तसिर पठाण उर्फ बब्बुभाई याच्याकडे देण्यास सांगितले. उर्वरित २०,०००/- रु मा.न्यायालयात रिपोर्ट सादर केल्यानंतर द्या असे म्हणून लाच मागणी केली आहे.त्यानंतर पंचासमक्ष करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान आरोपी खाजगी इसम पठाण यांनी मोटारसायकल वर बसून तक्रारदार यांचे कडून लाचेची रक्कम ५०,०००/- रू. स्विकारून ते लाचेच्या रक्कमेसह पळून गेले.आरोपी पठाण यांचा मानवत शहरात शोध घेऊन त्यांना शिताफीने ताब्यात घेतले आहे. आरोपी लोकसेवक जंत्रे, श्रेणी पोलीस उप निरीक्षक यांना देखील ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांच्या मानवत येथील घराची घरझडती घेतली असता नगदी रोख रक्कम ७४,५००/- रू. मिळून आली आहे.

| | |
|---|---|
| सापळा पथक | सदरची सापळा कार्यवाही डॉ.राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नांदेड परिक्षेत्र नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली लाप्रवि परभणी चे पोलीस उप अधिक्षक श्री. अशोक इप्पर, पोलीस निरीक्षक श्री.सदानंद वाघमारे, पोलीस निरीक्षक श्री.बसवेश्वर जकिकोरे व टिम एसीबी परभणी यांनी पार पाडली. |
| तपास अधिकारी | श्री. अशोक इप्पर, पोलीस उप अधीक्षक, लाप्रवि युनिट,परभणी. |

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या इसमाविरुध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.**


| | |
|---|---|
| संपर्क पत्ता :- कार्यालय पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, शनिवार बाजार,नानलपेठ, परभणी. | |
| दुरध्वनी क्रमांक :- 02452-220597 टोल फ्री क्रमांक:- 1064 | ऑनलाईन ॲप acbmaharastra.net |
| मा. पोलीस अधीक्षक 9623999944 | पोलीस उप अधीक्षक 9850483337 |
| spacbnanaded@mahapolice.gov.in | dyspacbparbhani@mahapolice.gov.in |
| Facebook : Acb Parbhani | Facebook page : Anti Corruption Bureau,Parbhani. |
| Instagram : acbparbhani | Twitter : @ACBPARBHANI |
| Youtube Channel @ACBParbhani | Find office Loaction on Google Map & Mappels India Map |

पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,परभणी


Scanned with OKEN Scanner